# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक १०/०४/२०१८**

## १) आत्महत्येस प्रवृत करणे :-

**तामसा :- १०**.०४.२०१८ चे १७.०० वा.पुर्वी नांदेड येथे यातील **फिर्यादीचा मुलगा मयत नामे रामदास सोपानराव कोरपल्लेवार, वय ३४ वर्षे** यास नमुद आरोपीचे सततचे मानसिक त्रास, शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकीचे त्रासास कंटाळुन स्वता: चे राहते घरी छताचे कडीला दोरीने गळफास घेवुन मरण पावला. वगैर **फिर्यादी सोपान पि.किसनराव कोरपल्लेवार, वय ५६ वर्ष व्यवसाय मडके बनविणे रा. खेरडा ता.औराद जि.बिदर राज्य कर्नाटक** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो. स्टे. तामसा** गुरनं. २६/२०१८ कलम ३०६, ५०४,५०६, भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/एम.बी.गोमारे, मो.क्र.९०४९९८०७५५** हे करीत आहेत.

## २) फसवणुक :-

**वजिराबाद :-** दिनांक ०१.०४.२०१८ रोजी चे १०.०४ वा. ते दि.०३.०४.२०१८ चे १६.०० वा. चे दरम्यान निलंगा ते शक्तीनगर, नांदेड येथे यातील अज्ञात आरोपीने फिर्यादी यास (मोबाईल नंबर ९५०७४०९५९४) या नंबर वरुन कॉल करुन एस.बी.आय.बॅकेमधुन बोलतो तुमचे ए.टी.एम.कार्ड व्हिरिफिकेशन करणे आहे असे भासवुन फिर्यादीचे ए.टी.एम.चा १६ अंकी नंबर सी.सी.व्ही. नंबर व मेसेज मधील ओ.टी.पी. क्रं.मागुन त्याचे एस.बी.आय.खात्यातील ५०,०००/- रूपये परस्पर काढुन घेतले व फसवणुक केली वगैरे **फिर्यादी दत्त विठोबा नरवणे, वय ५१ वर्षे व्यवसाय रबर स्पलायरस रा.शक्तीनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. वजिराबाद** गुरनं ६६/२०१८ कलम ४२०, भादवी सह कलम ६५ (सी), (डी), आय.टी.ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल असून **तपास पोनि/प्रदीप काकडे, मो.क्रं.९८२३५६९७७७** हे करीत आहेत.

## ३) जनावर चोरी :-

**अर्धापुर :-** दिनांक ०४.०४.२०१८ चे २१.३० ते २३.०० वा. चे दरम्यान शेतातील आखाडयावर मौ. मालेगाव शिवार, ता.अर्धापुर जि.नांदेड येथील फिर्यादीचे बांधलेले दोन बैल अंदाजे किंमती ९५,०००/- रुपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी राजकुमार माधवराव आस्वदे, वय ३७ वर्षे व्यवसाय शेती रा. बसवेश्वर नगर मालेगाव, ता.अर्धापुर जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.अर्धापुर** गुरनं ६४/२०१८ कलम ३७९, भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ /१५३९ देशपांडे, मो.नं. ७९७२३६०७३१** हे करीत आहेत.

## ४) हयगयीने वाहान चालवुन मरणास कारणीभुत (अपघात) :-

**नांदेड ग्रामिण :-** दिनांक ०९.०४.२०१८ रोजी चे १५.३० वा. चे सुमारास मुदखेड ते वाजेगाव बायपास चौक वाजेगाव, नांदेड येथे यातील **मयत नामे मो.मुदस्सीर पि.मो.गौस, वय २८ वर्षे रा. उमर कॉलनी, नांदेड** हा **उमरी ते नांदेड येत असतांना यातील नमुद** आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रक क्रमांक एम.एच.४४-८०७१ हा भरवेगात हयगय व निष्काळजीपणाने चालवुन मयताचे मोटार सायकलीस जोराची धडक देवुन यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी मो.माहसिन पि.महसिन गौस, वय ३१ वर्षे व्यवसाय (खा) नौकरी रा.उमर कॉलनी देगलूर नाका, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो. स्टे.नांदेड ग्रामिण** गुरन १२०/२०१८ कलम ३०४ (अ), २७९, ४२७, भादंवि कायदया प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/नेहरकर, मो.नं ९६०४६९०४९४** हे करीत आहेत.

## ५) बेकायदेशिररीत्या देशी दारु बाळगुन मिळुन आला :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक ०९.०४.२०१८ रोजी चे १७.०० वा. चे सुमारास मुसलमानवाडी, नांदेड येथे यातील आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्राचे १८० एम.एल.चे २८ बॉटल अंदाजे किंमत १,४५६/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोना/२०९० संजय दिगांबर पांढरे, ने. स्था.गु.शा.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.नांदेड ग्रामीण** गुरन १२१/२०१८ कलम ६५ (ई) महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२११७ कोमुलवार, मो.क्र. ८३७८९६७९९९** करीत आहेत.

## ६) आकस्मात मृत्यु :-

## अ) रेल्वेने कटून आकस्मात मृत्यु :-

**मुदखेड :-** दिनांक ०९.०४.२०१८ रोजी चे १४.०० वा. सुमारास मुदखेड ते मुगट रेल्वे पटरीवर, जि. नांदेड येथे यातील **अनोळखी पुरुष जातीचे प्रेत** असलेला हा रेल्वे समोर येवुन कटून मरण पावला. वगैरे **खबर देणार सुशील किशनराव खैरे, वय २९ वर्ष व्यवसाय नौकरी रेल्वे मास्तर, मुदखेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.मुदखेड** आ.मृ. १२/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास सपोउपनि/पी.के.केंद्रे, मो.क्र. ९८२३९९६३१४** हे करीत आहेत.

## ब) विषारी औषध तोंडात जावुन मृत्यु :-

**लोहा :-** दिनांक ०८.०४.२०१८ रोजी चे १६.०० चे सुमारास संगुचीवाडी, ता.कंधार जि.नांदेड येथे, यातील **मयत नामे राजेश्वर ज्ञानोबा नेरले, वय ३० वर्षे व्यवसाय शेती रा.संगुचीवाडी, ता.कंधार** हा शेतात फवारणी करीत असतांना तोंडात औषध जावुन मरण पावला. वगैरे **खबर देणार रामकिशन नामदेव जकवाड, वय ४६ वर्ष व्यवसाय शेती रा. संगुचीवाडी ता.कंधार जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.लोहा** आ.मृ. ११/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/१५१६ पठाण, मो.क्र. ९९२३८७१६४५** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४

<u>**प्रेस नोट**</u>

दिनांक :- १०.०४.२०१८

## लोकांना खंजर, तलवार दाखवुन भर रस्त्यात लुटमार करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेकडुन जेरबंद

मा. पोलीस अधीक्षक श्री. चंद्रकिशोर मिणा तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश शिंदे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप गुरमे यांना आदेशीत करुन नांदेड शहरात वाहन आडवुन खंजर, तलवारचा धाक दाखवुन लुटमार करुन हैदोस घालणाऱ्या टोळीस जेरबंद करण्यासाठी एका पथकाची स्थापना करण्याचे आदेश दिले त्यावरुन पोलीस निरीक्षक संदीप गुरमे यांनी पथकातील प्रमुख पोउपनि विनायक शेळके, पोहेकॉ शेषराव शिंदे, पोना संजय पांढरे, राजु पांगरेकर, पोकॉ मोतीराम पवार, व्यंकट गांगुलवार, तानाजी येळगे, चालक पोशि बालाजी मुंडे यांनी नांदेड शहरातील गुन्हेगाराची शोध घेवुन अटक करण्याचे आदेश दिल्याने आम्ही लातुर फाटा आंबेडकर चौकात पेट्रोलींग करीत थांबलो असता एक इसम जख्मी अवस्थेत आम्हाला चौकात दिसला त्यास विचारपुस करता तो दोन मोटारसायकलवर पाच इसम येवुन माझ्या जवळील मोबाईल व नगदी ४०००/- रु जबरीने माझ्या गालावर खंजरने वार करुन घेवुन गेले आहेत. त्यावरुन आम्ही लगेत फिर्यादीसह घटनास्थळी जावुन आरोपीचा शोध घेत असतांना फिर्यादी यांनी सिडकोकडे जाणारी संशयीत मोटारसायकल दाखविली त्यावरुन आम्ही त्यांचा पाठलाग केला ते आम्हास पाहुन सैरावैरा पळु लागले त्यांना शिताफीने दोन आरोपी पकडले त्यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली देऊन त्यांनी फिर्यादीचे जबरीने चोरलेले रक्कम जप्त केली आहे. बाकी उर्वरीत आरोपी हे मोटारसायकलने पळुन गेले आहेत. फरार आरोपीतांचा शोध चालु आहे. आरोपीने वापरलेली मोटारसायकल, आरोपी व जप्त नगदी रुपये पोलीस स्टेशन नांदेड ग्रा. यांचे कडे पुढील कार्यवाही साठी देण्यात आले आहे.

पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड